# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 25.11.2024** **वार – सोमवार**

---

**सत्ता स्थापना**

विधानसभा निवडणुकीचे निकाल जाहीर झाल्यानंतर राज्यात सत्तास्थापनेबाबत विविध पातळ्यांवर चर्चा सुरु आहे. महायुतीतल्या शिवसेनेच्या गटनेतेपदी विद्यमान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची, तर राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेतेपदी अजित पवार यांची निवड कालच झाली आहे. मात्र भाजपा विधिमंडळ पक्षाची नेतानिवड अद्याप झालेली नाही. भाजपा विधिमंडळ पक्षाची बैठक आज होणार असून ती झाल्यावर मुख्यमंत्रीपदाबाबतचा निर्णय होईल, असं अजित पवार यांनी कराड इथ माध्यमांशी बोलताना सांगितलं.

**अभिवादन**

माजी मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांची आज पुण्यतिथी आहे, यानिमित्त पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने त्यांच्या प्रतिमेला तसंच यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयातील त्यांच्या पुतळ्याला अतिरिक्त आयुक्त चंद्रकांत इंदलकर यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं

**समाधी सोहळा**

श्रीसंतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज संजीवन समाधी सोहळा आणि कार्तिकी यात्रेनिमित्त राज्यभरातून भाविक आळंदीत दाखल होऊ लागले आहेत. कार्तिक वद्य अष्टमी ते अमावस्येपर्यंत कार्तिकी वारी सोहळा चालणार असून मुख्य कार्तिकी एकादशी उद्या मंगळवारी आणि माउलींचा संजीवन समाधी सोहळा गुरुवारी असणार आहे. या निमित्तानं शहरात विविध ठिकाणी हरिनाम सप्ताह आणि ज्ञानेश्वरी पारायण सुरू आहे. दरम्यान माऊलींच्या संजीवन समाधी सोहळ्याला आलेल्या भाविकांसाठी आळंदी ग्रामीण रुग्णालयानं माउली मंदिरात दोन आरोग्य सेवा केंद्र तयार केली आहेत. त्यापैकी एक केंद्र दिवसभर तर दुसरं दिवस आणि रात्र पाळीतही सेवा देणार आहे.

**पुस्तक प्रकाशन**

वैद्यकीय क्षेत्रात अनैतिकता वाढत चालली असून भारतात इच्छामरणाला संमती दिली पाहिजे, असं मत प्रसिद्ध साहित्यिक संजय सोनवणी यांनी नुकतंच पुण्यात व्यक्त केलं. संगीता भारत लोटे यांनी लिहिलेल्या 'इच्छामरण' या सत्य घटनेवर आधारित पुस्तकाचं प्रकाशन सोनवणी यांच्या हस्ते झालं; त्यावेळी ते बोलत होते. गरीबांचे डॉक्टर म्हणून डॉक्टर भारत लोटे यांची ओळख होती. रत्नागिरी जिल्ह्यात केलेल्या उत्कृष्ट रुग्णसेवेबद्दल त्यांना राज्य शासनाचा मानाचा आनंदीबाई जोशी पुरस्कार मिळाला आहे. मात्र 2017मध्ये पुण्यातल्या एका खासगी रुग्णालयात भारत लोटे यांच्यावर चुकीचे उपचार करण्यात आले; त्यामुळे झालेला शारीरिक आणि मानसिक त्रास, दवाखान्याकडून मिळालेली हीन वागणूक यामुळे डॉक्टर लोटे यांच्यावर इच्छामरण मागण्याची वेळ आली. याच सत्य घटनेवर आधारित 'इच्छामरण' हे पुस्तक आहे, असं संगीता लोटे यांनी सांगितलं.

**कार्यशाळा**

कामाच्या ठिकाणी होणारा महिलांच्या लैगिंक छळाला प्रतिबंध करणारा कायदा अर्थात पॉश कायद्याविषयी जागृती करण्यासाठी पुण्यातल्या यशस्वी संस्थेमध्ये आज एक कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. यावेळी ॲडव्होकेट भूमिका पांढरे यांनी उपस्थित विद्यार्थी आणि विद्यार्थिनींना मार्गदर्शन केलं. करिअरला सुरुवात करण्यापूर्वीच्या विद्यार्थीदशेतच या कायद्याची माहिती, महत्व आणि संवेदनशीलता समजल्यामुळे भविष्यातील नोकरदार आणि अधिकारी वर्ग महिला सुरक्षेला निश्चितच प्राधान्य देणारा असेल, असं मत संस्थेचे संचालक डॉ. शिवाजी मुंढे यांनी व्यक्त केलं.

**रुग्णालय**

पुणे जिल्ह्यतील शासकीय रुग्णालयांमध्ये मोफत उपचार सुरू केल्यापासून तिथे उपचार घेणाऱ्या रुग्णांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाली आहे. त्याचबरोबर तपासण्या, औषधेदेखील मोफत असल्याने तपासण्यांमध्येही वाढ झाली आहे. सेवा मोफत झाल्यापासून जिल्हा रुग्णालयात बाह्यरुग्ण विभाग, एक्स रे, सोनोग्राफी, ईसीजी तपासण्यांमध्ये नऊ ते 25 टक्के वाढ झाली आहे. मात्र रुग्णांनी विनाकारण तपासण्यांचा आग्रह करू नये, असं औंध जिल्हा रुग्णालयाचे जिल्हा शल्यचिकित्सक डॉक्टर नागनाथ यमपल्ले यांनी सांगितलं.

**खो-खो**

उत्तरप्रदेशात आजपासून येत्या 29 नोव्हेंबरदरम्यान होणाऱ्या 43व्या कनिष्ठ गटाच्या राष्ट्रीय अजिंक्यपद खो-खो स्पर्धेसाठी महाराष्ट्राचा कुमार गटाचा आणि मुलींचा संघ जाहीर झाला आहे. यामध्ये मुलांच्या गटात चेतन गुंडगळ, भावेश माशिरे या पुण्याच्या खेळाडूंना स्थान मिळालं आहे.

**हॉकी**

पुणे जिल्हा हॉकी संघटनेच्या मान्यतेने फादर शॉच मेमोरियल आंतरशालेय हॉकी स्पर्धा उद्यापासून सुरू होत आहे. यावर्षी ही स्पर्धा 12 वर्षांखालील मुलं, 14 वर्षांखालील मुलं आणि मुली, 17 वर्षांखालील मुलं आणि 19 वर्षांखालील मुली अशा 5 वयोगटांमध्ये होईल. स्पर्धेसाठी 56 संघांनी सहभाग नोंदवला असून यामध्ये महापालिकेच्या शाळांबरोबरच खासगी शाळांचे संघही असतील. येत्या 7 डिसेंबरपर्यंत चालणारी ही स्पर्धा साखळी आणि बाद पद्धतीने खेळली जाईल.

**हवामान**

पुणे आणि परिसरात तापमानाचा पारा खाली घसरत आहे; आज किमान तापमान 12 अंशांपर्यंत खाली आलं होतं. उद्याही आकाश मुख्यतः निरभ्र राहून सकाळी धुकं पडण्याची शक्यता आहे. उद्या कमाल तापमान 28 आणि किमान तापमान 12 अंश सेल्सियसच्या आसपास राहण्याचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**तर हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर संध्याकाळी 6 वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये. नमस्कार.**